'सॉफ्टलॅब्ज गृप' शुभेच्छांकित...

आपली सिंधुनगरी न्यूज चॅनेल प्रस्तुत

दिवाळी विशेष अंक २०२६

आकाशकंदील

आपला सिंधुनगरी न्यूज चॅनेल

माध्यम जे जपते बातमी सोबत संस्कृती

संस्कार दिवाळी..

स्विकार दिवाळी...!

शुभ दीपावली

मुख्य संपादक : सुयोग पंडित



प्रस्तावना...!



प्रस्तावना लेखन :
श्री. गिरीधर पुजारे
(ज्येष्ठ रंगकर्मी,
मुंबई - सिंधुदुर्ग)

सन्माननीय वाचकहो...!
सर्वांना मनःपूर्वक नमस्कार.
आपली सिंधुनगरी न्यूज चॅनलच्या 'आकाशकंदील दीपावली विशेषांक २०२६' च्या निमित्ताने पुन्हा एकदा आपली भेट होत आहे हा आनंद आहे.

मंडळी, काळ धकाधकीचा आहे आणि दुष्काळाच्या अपरिहार्यतेचा आहे. यातूनही आपली सांस्कृतिक तत्वे जपताना सदैव प्रकाशमान रहाण्यासाठी आपल्याला आपली अक्षरसेवा सहाय्य करत असते हे आपले भाग्य आहे. त्याच अक्षरसेवेचा छोटासा अंश असलेल्या 'आकाशकंदील दीपावली विशेषांक २०२६' ची 'संस्कार दिवाळी, स्वीकार दिवाळी' अशी संकल्पना ही अंतर्मुख करुन जाणारी ठरत आहे. यंदाच्या ह्या अंकातील बहुतांश लेखांचे लेखक हे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रकार प्रतिनिधी आहेत हे नक्कीच विशेष आहे. सदैव समाजाला प्राधान्य देऊन स्वतःला लेखणीआड किंवा पडद्याआड ठेवलेला व्यापक तरिही अदृश्य चेहरा म्हणजे पत्रकार आणि त्याच पत्रकाराच्या लेखनातून त्याचेच दीपावली आणि संबंधित अनुभव वाचायला मिळणे हा नक्कीच एक 'दुर्मिळ योग' म्हणता येईल.

आपली सिंधुनगरी न्यूज चॅनलचा 'आकाशकंदील' हा छोटेखानी डिजिटल दीपावली विशेषांक २०२६ अत्यावश्यक अंतर्मुखतेच्या विचारांचे, संस्कारांचे आणि स्विकाराचे लक्षदीप उजळून जातोय. या अंकासाठी योगदान दिलेल्या सर्व मान्यवरांची मनःपूर्वक प्रशंसा आणि दीपावलीच्या मंगलमय शुभेच्छा.

कसाटा आईस्क्रीम..!



लेखन : श्री. प्रसाद कुलकर्णी
(स्तंभ लेखक, सिंधुदुर्ग । मुंबई)

वाईट दिवसांना नाकारु नका. ते तुम्हाला जगायला शिकवतात. दुःखाची जवळून ओळख झाल्याखेरीज माणसाला सुखाची किंमत कळत नाही.

शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या शोधात मी आणि माझा भाऊ, प्रशांत कणकवलीहून मुंबईला आलो त्याला तीन दशकांहून अधिक काळ लोटला आहे. या तीन दशकांत खूप काही केले आहे व घडवले आहे. कवी, स्तंभलेखक आणि वक्ता म्हणून नाव कमावले. चित्रपट केले. मोठी माणसे जोडली. व्यवसायच असा होता की त्याने समाधान दिले. फार नाही पण आनंदाने जगण्यापुरता पैसा कमावला. व्यवसायाच्या निमित्ताने खूप भ्रमंती केली. अख्खा महाराष्ट्र पालथा घातला. भारतभ्रमण केलं. अर्धा डझन परदेश फिरलो. भलेबुरे अनुभव घेतले.
आयुष्याचा खरा अनुभव हस्तीदंती मनोऱ्यात बसून घेता येत नाही हेच खरं..!
जगण्याची लढाई युद्धभूमीवर उतरूनच लढावी लागते. वाईट अनुभव कुणालाही नको असतात. पण ते घेतल्याशिवाय चांगल्याची किंमत कळत नाही.

आमचा सुरुवातीचा काळ खूप हालअपेष्टांचा होता. वैफल्याचे, अपमानाचे अनेक अनुभव घेतले. अगदी आत्महत्या करावी असे वाटेपर्यंत.....!
पण त्या दिवसांनी खूप काही शिकवले. आयुष्याच्या विद्यापीठातल्या कठीणातल्या कठीण परीक्षा त्या काळात दिल्या.

१९८५ - १९८६ चे दिवस होते. माझे वय वीस वर्षे तर माझा भाऊ, प्रशांत अठरा वर्षांचा होता. मुंबईच्या विलेपार्ले या उपनगरात आम्ही पेईंग गेस्ट राहत होतो. मला स्टायपेंड होता ४०० रु. आणि त्याला ३००. दोघांचे मिळून हातात ७०० रु. येत. प्रत्येकी शंभर रुपये घरभाडे दिले की उरलेल्या ५०० रुपयांत आमचा दोघांचा

सगळा खर्च भागवत असू. दोन वेळचे जेवणखाण, चहापाणी, प्रवास, कपडालत्ता वगैरे. किशोरवय होतं, कधीतरी पिक्चर बघावासा वाटायचा. कधीतरी चौपाटीवर मित्रांबरोबर फिरायला, कधीतरी पिकनिकला जायचो. खूप काटकसर करावी लागायची. कधीकधी चक्क कोरडा पाव खाऊन रहात असू. एवढंच नव्हे तर पैसे वाचवून तीन - चार महिन्यांनी गावी, कणकवलीला जाताना बहिणींसाठी कपडे आणि खाऊ घेऊन जात असू. त्या दोघीही आमच्यापेक्षा खूप लहान होत्या. अजाण होत्या. त्यांना मुंबई फक्त हिंदी चित्रपटात पाहून माहिती होती. त्यांना वाटायचे की आपले भाऊ मुंबईला बॅरिस्टरकी किंवा तत्सम धंदा करतात आणि चित्रपटात दाखवतात तशा आलिशान बंगल्या बिंगल्यात रहातात.

विलेपार्ले स्टेशनबाहेरच्या जीवन हॉटेलमध्ये त्यावेळी राईस प्लेट होती अडीच रुपये...! (आता तिचा दीडशे रुपये दर आहे.) तिथे मी आणि प्रशांत रात्रीचे जेवायला जात असू. तो दिवाळीचा आदला दिवस होता. आम्ही राईसप्लेट मागवली. आमचं जेवून झालं. आमच्या समोरच्या टेबलवर एक गुजराती फॅमिली बसली होती. नवरा, बायको आणि दोन मुले..! त्यांचे जेवण झाल्यावर त्यांनी कसाटा आईस्क्रीम मागवलेलं आम्ही पाहिले. हे 'कसाटा आईस्क्रीम' मी एवढे दिवस ऐकून होतो. पण त्यांच्या टेबलवर आलेला तो पदार्थ पाहिला आणि मलाही खाण्याची अतीव इच्छा झाली. मी प्रशांतला म्हटलं, “प्रशांत, आपण आईस्क्रीम घेऊया का रे?”

त्याने मेनू कार्ड बघितलं. किंमत पाहिली. आमच्या खिशातले पैसे आम्ही मोजले. मग त्याने कसाटा आईस्क्रीमची ऑर्डर दिली. दोघांनी ऐटीत चवीचवीने आईस्क्रीम खाल्ले. खाऊन झाल्यावर बिल चुकते केले. एवढेच नव्हे तर उरलेले आठ आणे वेटरला टीप म्हणून दिली...! खिशातले सगळे पैसे संपले. आम्ही बाहेर पडलो.

दुसऱ्या दिवशी दिवाळी होती. आम्हाला दोघांनाही सुट्टी होती. उशीरा उठलो. कारण उठवणारे कुणी नव्हते, विचारणारे कुणी नव्हते, अभ्यंगस्नानाचा प्रश्नच नव्हता...! जवळ घेणारे कुणी नव्हते. आई, बाबा आणि बहिणी दूर हजार किलोमीटरवर राहिल्या होत्या. आजच्यासारखं विश करण्यासाठी फोन उपलब्ध नव्हते. मोबाईलचा तर जन्मही झाला नव्हता. फटाकेही उडवायचे नव्हते. मुळात जिथे 'खायचेच

वांदे होते तिथे फटाक्यांवर पैसा कुठे जाळणार होतो...!' खिशातले पैसे आदल्या रात्री 'कसाटा आईस्क्रीम' खाऊन संपवले होते. बँकेतली इमर्जन्सी साठी म्हणून ठेवलेली तुटपुंजी शिल्लक जरी काढायची म्हटली तरी तीन दिवस बँका बंद होत्या. रिकामे खिसे आणि उपाशी पोटं घेऊन मी आणि प्रशांत फिरायला निघालो. काल ज्या जीवन हॉटेलमध्ये भरपेट जेवलो होतो, कसाटा आईस्क्रीम खाल्ले होते त्याच हॉटेलच्या दारावरून तीनचार चकरा मारल्या. उपयोग तर काहीच नव्हता. आत जाण्यासाठी खिशात दमडी नव्हती आणि काऊंटरवर बसलेले मालक निमंत्रण देऊन आत बोलवतील म्हणावे तर आम्ही त्यांचे जावई थोडेच होतो....! अख्खे शहर दिवाळी साजरी करत असताना आम्ही मात्र दिवसभर उपाशी राहिलो. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी एका मित्राकडून थोडे उसने पैसे घेतले आणि ते पुढचे दोन-तीन दिवस कसेबसे पुरवून वापरले.

आता प्रशांत मोठा उद्योजक झालाय. मी मोटिवेशनल स्पीकर म्हणून देश विदेश फिरत असतो. माझ्या व्यवसायाच्या निमित्ताने ओबेरॉय, ताजसारख्या पंचतारांकित हॉटेलमध्येही अधूनमधून जातो. पण तिथे जेवताना मला ती पस्तीस वर्षांपूर्वीची दिवाळी अजून आठवते. उतायचं नाही, मातायचं नाही, पैसा जपून खर्च करायचा हे सारं त्या दिवसांनी मला शिकवलंय.

म्हणून म्हणतो, वाईट दिवसांना नाकारु नका. ते तुम्हाला जगायला शिकवतात.



गरिबीतही आनंदाचे दिवे उजळवणारी माझ्या बालपणीची दिवाळी



लेखन : श्री. मनोज चव्हाण
(पत्रकार | मालवण)

दिवाळी आली की आजही मन नकळत भूतकाळात हरवून जाते. डोळ्यांसमोर उभे राहते ते मालवणमधील माझे बालपण... घरातील लगबग, आईच्या हातांचा सुगंध, वडिलांची धावपळ, चार भावंडांचा गोंधळ आणि परिस्थितीचे कितीही चटके बसले तरी चेहऱ्यावरचा आनंद कधीही कमी न होऊ देणारे आमचे कुटुंब. आता दिवाळीचे स्वरूप खूप बदलले आहे. रोषणाई वाढली, फराळाचे पदार्थ वाढले, नवनवीन प्रकारच्या कपड्यांची खरेदी वाढली आहे. माझ्या बालपणसारखा दिवाळीचा साधेपणा आणि माणसांमधील जिव्हाळ्यास छोट्या - छोट्या गोष्टींतून मिळणारा आनंद पुन्हा अनुभवता येईल का असाही माझ्या मनाला प्रश्न पडतो.

आमच्यासाठी दिवाळी हा एक खूप मोठा सण तर होताच आणि आई-वडिलांच्या कष्टांचा, त्यागाचा, प्रेमाचा आणि संस्कारांचा सक्षमता शिकवणारा ऋतू होता. माझे वडील अत्यंत सालस कष्टाळूपणाने सलूनचा व्यवसाय करायचे. त्यांच्या हातात केशकर्तनाचे पारंपारिक कौशल्य होते. त्या काळात सर्वसामान्य कुटुंबाचा गाडा ओढणे म्हणजे रोजच्या रोज नव्या आव्हानांना सामोरे जावे लागत असे. आमचे उत्पन्न मर्यादित होते पण कुटुंबाच्या गरजा मात्र अनेक होत्या हे जाणून आईनेही संसाराला हातभार लावण्यासाठी कष्टांची पराकाष्ठा केली होती. ती काजूगराच्या गिरणीतून असोले काजू घरी आणायची आणि ते सोलण्याचे काम करायची. तिच्या हातांना कष्टांची सवय होती, डोळ्यांसमोर संसाराची चिंता होती आणि मनात आपल्या चारही मुलांना सन्मानाने विकसित करण्याचे स्वप्न होते. वडिलांच्या सलूनमधील मेहनतीचा घाम आणि आईच्या हातांवर उमटलेल्या कष्टांच्या खुणा यांतूनच आमच्या कुटुंबाचा पाया रचला गेला. आमच्या घरात पैशांची श्रीमंती नव्हती पण प्रेमाची, माणुसकीची आणि एकमेकांसाठी काहीही करण्याची

तयारी असलेली 'मनाची श्रीमंती' मात्र भरभरून होती.

आमच्या बालपणी मात्र दिवाळीचा आनंद हा महागड्या झगमगाटाच्या वस्तूंवर अवलंबून नव्हता. घरची परिस्थिती बेताची असली तरी दिवाळी पारंपरिक पद्धतीने मोठ्या आनंदात साजरी व्हायची. आपल्या ऐपतीनुसार सण साजरा करण्याची आमच्या आई-वडिलांची पद्धत होती. किती खर्च केला, यापेक्षा घरात किती आनंद निर्माण केला याला ते अधिक महत्त्व देत होते.

दिवाळी जवळ आली की घरात एक वेगळीच लगबग सुरू व्हायची. घराची स्वच्छता, फराळाची तयारी आणि सणाच्या दिवसांची आतुरतेने होणारी वाट पाहणे... या सगळ्यांतूनच दिवाळीचा खरा आनंद मिळायचा.

आज बालवयात एखादी वस्तू सहज मिळते. पण त्या काळात एखादी छोटीशी गोष्ट मिळाली तरी तिचे अप्रूप वाटायचे. त्यावेळच्या नवीन कपड्यांचा आनंद, फराळाच्या आवडीचे नेमके पदार्थ किंवा घरातील सगळ्यांनी एकत्र बसून घालवलेला वेळ हे घटक आजही मनात कायमचे साठून आहेत.

आज लक्षात येते की, त्या दिवाळीत वस्तू कमी होत्या पण समाधान भरपूर होते. खर्च कमी होता पण आनंद अमाप होता. परिस्थिती साधी होती पण नात्यांमधील श्रीमंती अफाट होती...! आमच्या घरात दिवाळीच्या पणत्या मोजक्या असतील पण त्या उजळवणाऱ्या आई-वडिलांच्या प्रेमाच्या प्रकाशाचे पर्व मात्र लक्षदीपांचे होते.

आम्ही चार भावंडे. आमच्या आई-वडिलांसाठी आम्हीच त्यांची खरी संपत्ती होतो. आम्हाला मोठे करणे, आमच्या गरजा भागवणे, योग्य संस्कार देणे आणि पुढे आमचे संसार उभे राहावेत, यासाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट घेत संयम, त्याग आणि मनाचा अखंड मोठेपणा जपला.

आई-वडिलांनी आपल्या कष्टातून हे सगळे उभे केले. स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवून मुलांच्या आनंदाला प्राधान्य दिले. स्वतःच्या आयुष्यात कितीही अडचणी आल्या, तरी मुलांच्या चेहऱ्यावरचे हसू टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला.

आज चारही भावंडांचे संसार उभे राहिले आहेत, ही आठवण मनाला समाधान देते. यामागे आई-वडिलांनी घेतलेल्या कष्टांची जाणीव झाली की त्यांच्याप्रती कृतज्ञतेने मन भरून येते.
आमच्या आई-वडिलांनी दिलेले संस्कार, कष्ट करण्याची शिकवण आणि कुटुंब एकत्र ठेवण्याची ताकद ही आमची सर्वांत मूल्यवान श्रीमंती आहे.

चार भावंडांमध्ये मी शेंडेफळ असल्याने घरात माझे थोडे जास्त कौतुक व्हायचे. मोठ्या भावंडांच्या तुलनेत लहान असल्यामुळे मिळणारे प्रेम, लाड आणि काळजी या सगळ्यांचा अनुभव माझ्या बालपणाचा अविभाज्य भाग आहे. लहान असताना त्या प्रेमाची खरी किंमत कळत नव्हती. आपल्यासाठी आई-वडील किती कष्ट घेतात, मोठी भावंडे आपल्याला किती जपतात आणि घरातील प्रत्येक जण आपल्याला आनंदी ठेवण्यासाठी किती प्रयत्न करतो, याची मला कृतज्ञतेची जाणीव असते.

लहानपणी वाटणाऱ्या साध्या गोष्टी आज आठवल्या की त्यांचे मोल समजते. आई-वडिलांचे प्रेम, भावंडांचे लाड आणि कुटुंबाने दिलेली सुरक्षिततेची भावना ही कोणत्याही बाजारात विकत मिळणारी गोष्ट नाही. आज मी आयुष्याच्या या टप्प्यावर उभा असताना बालपणी मिळालेल्या त्या प्रेमाची आठवण मनाला भावूक करते. कारण काळ पुढे गेला, परिस्थिती बदलली, जबाबदाऱ्या वाढल्या पण त्या बालपणीच्या आठवणी मनाच्या एका कोपऱ्यात आजही तितक्याच ताज्या आहेत.

कितीही मोठे झालो, कितीही यश मिळवले, तरी आई-वडिलांसाठी आपण त्यांचे लहान मूलच असतो. या नात्यातील निरागसता आणि प्रेम हेच आयुष्याचे खरे वैभव आहे.

आमच्या बालपणीच्या दिवाळीने मला एक गोष्ट शिकवली - आनंद हा परिस्थितीवर नव्हे, तर परिस्थितीकडे पाहण्याच्या आपल्या दृष्टिकोनावर अवलंबून असतो. घरात किती पैसा आहे, यापेक्षा घरात किती प्रेम आहे, हे महत्त्वाचे असते. आपण किती महागड्या वस्तू खरेदी केल्या, यापेक्षा आपण आपल्या माणसांना किती आनंद दिला, याला अधिक मोल असते.

वडिलांनी कष्टातून प्रामाणिकपणा शिकवला. आईने त्यागातून संसाराचा अर्थ समजावला. चार भावंडांच्या सहवासाने नात्यांची ताकद कळली आणि गरिबीत साजऱ्या झालेल्या दिवाळीने समाधानाचा खरा अर्थ शिकवला.

आज मागे वळून पाहताना वाटते, त्या काळात आमच्याकडे भरपूर पैसा असता, तर कदाचित अनेक गोष्टी सहज मिळाल्या असत्या पण अभावातही आनंद शोधण्याची जी कला आम्हाला मिळाली, ती कदाचित गवसली नसती.

अभावाने आम्हाला खचवले नाही, तर लहानसहान गोष्टींचे महत्त्व शिकवले. कष्टांनी आम्हाला थकवले नाही, तर जबाबदारीची जाणीव करून दिली. आणि साध्या जीवनाने आम्हाला शिकवले की, सुखासाठी नेहमी मोठ्या गोष्टींची गरज नसते.

आजच्या मुलांना सर्व सुविधा उपलब्ध आहेत. या सुविधांसोबत आई-वडिलांच्या कष्टांची जाणीवही मुलांमध्ये निर्माण व्हायला हवी असे मनापासून वाटते.

दिवाळीला नवीन कपडे घेताना ते मिळवण्यासाठी आई-वडील किती मेहनत करतात, याचा विचार व्हावा. फराळाचा आस्वाद घेताना तो तयार करण्यामागील श्रमांची जाणीव असावी. घरात रोषणाई करताना आपल्या आयुष्यात प्रकाश आणण्यासाठी झटणाऱ्या माणसांचे महत्त्व समजावे.

आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आपल्या घरातील ज्येष्ठ माणसांच्या अनुभवांना वेळ द्यावा. त्यांच्याकडून त्यांच्या बालपणीच्या दिवाळीच्या गोष्टी ऐकाव्यात. कारण त्या गोष्टी केवळ आठवणी नसतात त्या आपल्या कुटुंबाचा इतिहास आणि संस्कारांचा वारसा असतात. गरजू माणसाच्या घरातही आनंदाचा दिवा पेटेल, यासाठी हातभार लावावा ही सुद्धा एक शिकवण महत्वाची आहे.

आज आयुष्याने अनेक वळणे घेतली आहेत. बालपण मागे पडले, जबाबदाऱ्या वाढल्या आणि काळाने अनेक बदल घडवले. पण दिवाळी आली की मन पुन्हा त्या जुन्या दिवसांत जाते.

वडिलांच्या सलूनमधील कष्ट आठवतात. काजूगराच्या गिरणीतून काजू आणून घरी सोलणाऱ्या आईचे कष्ट डोळ्यांसमोर येतात. चार भावंडांच्या बालपणातील आठवणी मनाला स्पर्श करून जातात आणि सर्वांत लहान असल्यामुळे मिळालेले ते प्रेम आठवले की मन भरून येते.

दिवाळीच्या निमित्ताने आज मागे वळून पाहताना आई-वडिलांना मनापासून सांगावेसे वाटते - तुम्ही आम्हाला केवळ वाढवले नाही, तर आयुष्य कसे जगायचे, हे शिकवले. तुम्ही आम्हाला केवळ सण साजरे करायला शिकवले नाही, तर प्रत्येक परिस्थितीत आनंद शोधायला शिकवले. तुमच्या कष्टांची परतफेड कधीच होऊ शकणार नाही. पण तुमच्या संस्कारांचा वारसा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हीच आमच्यासाठी खरी दिवाळी असेल.

माझ्या मालवणमधील सर्वसामान्य कुटुंबातील दिवाळीची ही कहाणी केवळ माझी नाही. ती अशा असंख्य कुटुंबांची कहाणी आहे, ज्यांनी मर्यादित साधनांमध्येही मुलांना भरभरून प्रेम दिले, कष्टाने संसार उभे केले आणि आनंदाचा अर्थ शिकवला.

आजच्या पिढीने आधुनिकतेचा स्वीकार जरूर करावा पण आपल्या संस्कारांचा विसर पडू देऊ नये. प्रगतीची वाट चालताना आपल्या मुळांशी असलेली नाळ तुटू देऊ नये. पैसा कमवावा, मोठे व्हावे, यश मिळवावे; पण त्या प्रवासात आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव आणि माणसांबद्दलची संवेदनशीलता कायम जपावी. कारण दिवाळी केवळ घर उजळवण्याचा सण नाही, तर मन उजळवण्याचा उत्सव आहे. ती केवळ नवीन वस्तूंचा आनंद नाही, तर जुन्या नात्यांची नव्याने जपणूक करण्याची संधी आहे.

माझ्या बालपणीच्या दिवाळीने मला शिकवले - गरिबी असली तरी आनंदाने जगता येते, अभाव असला तरी समाधान मिळवता येते आणि साधे आयुष्य जगूनही संस्कारांनी श्रीमंत होता येते!

आजही मनात त्या जुन्या दिवाळीचा एक दिवा तेवत आहे. त्या दिव्याचा

प्रकाश मला सतत आठवण करून देतो की, आयुष्यात कितीही पुढे गेलो तरी आपल्या माणसांना, आपल्या संस्कारांना आणि आपल्या संघर्षमय भूतकाळाला कधीही विसरायचे नाही.

आई-वडिलांच्या कष्टांना वंदन, भावंडांच्या प्रेमाला सलाम आणि त्या साध्या, सुंदर बालपणाला मनापासून नमस्कार!

चला, यंदा दिवाळी साजरी करूया, आई-वडिलांच्या संस्कारांचा प्रकाश उजळवुया..!





अप्रूपासह जागृतीच्या शिकवणीची दिवाळी..!



लेखन : श्री. अर्जुन बापार्डेकर
(पत्रकार | आचरा, सिंधुदुर्ग)

दिवाळी म्हणजे आनंदोत्सव, उत्साह,
तिमिरातुन तेजाकडे जाण्याचा सण..!
दिवाळीचा आनंद साजरा करण्यासाठी वयाचे बंधन नसते. बालपण, तरुणपण असो किंवा वृद्धापकाळ, दिवाळीचा आनंदोत्सव साजरा करण्याच्या पद्धती जरी निरनिराळ्या असल्या तरी उत्साह, आनंद मात्र भरभरून असतो.

काळानुरूप तसेच बदलत्या आर्थिक परिस्थितीनुसार दिवाळसणाची साधने, स्वरुप किंवा फराळाच्या पदार्थांचे प्रकार बदलत गेले तरी बालपणीच्या गरीबीतल्या दिवाळीतले समाधान आणि 'तो' आनंद सध्याच्या दिवाळीत किंवा एकंदर जीवनातच हरवत चालल्याचे जाणवू लागले आहे. पूर्वी बहुतांश शेतीवर गुजराण असायची. शेती मोठ्या प्रमाणात केली जायची. त्यामुळे शेतीची कामे दसऱ्यापासून देव दिवाळीपर्यंतही सुरुच असायची. 'माझी आई' यातूनही वेळ काढत दिवाळीच्या तयारीला लागायची. दसऱ्यानंतर ती, कापलेल्या भाताची मळणी घालण्यासाठी घरासमोर बनवलेले अंगण सारवून मस्त चकचकीत बनवायची, त्यावर सडारांगोळी काढली जायची. ती रांगोळी आतासारखी रंगीत रांगोळी नसायची तर रांगोळीचा दगड आणून बारीक केलेली रांगोळी असायची. आता वेगवेगळ्या रंगाच्या तयार रांगोळ्या मिळतात. त्यातून साकारलेल्या रांगोळ्या आकर्षक लक्षवेधी दिसतात तरीही आम्हाला मातीच्या खळ्यात शेणाच्या सारवणावर आई व बहिणीने काढलेला रांगोळीचा सडा प्रसन्नता निर्माण करुन जायचा. तो सडा आणि त्याची प्रसन्नता आजही आठवली की तितकाच आनंद होतो हे नक्की..!

दिवाळी जवळ येऊ लागली की पोह्याच्या गिरणी वरची गर्दी वाढू लागायची. यासाठी पहाटेच उठून गडद अंधारातून वडिलांसोबत डोक्यावर छोटी ओल्या भाताची मोटली (पिशवी) घेऊन रांगेत उभे राहायचे. ज्यांच्याकडे सायकल, वाहने

होती ते तिथे लवकर पोहोचून उभे रहायचे. आम्ही मात्र दहा किलोमीटरचे अंतर पायी तुडवीत जायचो. ओझे जड झाले तर मध्येच उतरवून पुन्हा डोक्यावर घेत चालतच पोह्याच्या गिरणीवर पोहोचायचो. एवढ्या कष्टांनंतर पोहे त्या दिवशी संध्याकाळी किंवा गर्दीनुसार दुसऱ्यादिवशी घरी यायचे.

दिवाळीची पहिली आंघोळ असलेला 'चावदिवस'. नरकचतुर्दशीचा दिवस जवळ येऊ लागायचा तशी आई फराळाला लागायची. आमचा बालपणीचा फराळ म्हणजे गोठ्यातल्या गायी म्हशीच्या किंवा गोठलीतल्या शेळीच्या दुधात भिजवलेले पोहे व पिठाचा लाडू आणि फारतर एखाद्या वर्षीच्या दिवाळीला शंकरपाळ्यांची चैन असायची..!
चकल्या, अनारसे, वेगवेगळ्या प्रकारचे लाडू, मिठाई अशा चमचमीत फराळाचे तेव्हा दर्शनही दुर्लभ होते. प्रचंड गरीबीमुळे अशाप्रकारचा फराळ दिवाळीला असतो हे माहीत सुद्धा नव्हते. पण मंडळी, बालपणीचा 'तो' गरीबीतला फराळ 'दरिद्री'पणाचा नव्हता...! आजच्या फास्ट फूड आणि चमचमत्या फराळालाही मागे पाडेल असा सुपोषक होता. पोह्यांमागील कष्ट, पिठाच्या लाडू, शंकरपाळ्यांमागचे आईचे कष्ट, कुटुंबासाठी बनवताना आईचे भरभरून पाझरलेले प्रेम आणि वात्सल्याने बनविलेल्या त्या फराळाची चव आजही जिभेवर रेंगाळते...आणि ती आठवण आनंदाने अदृश्य ढेकर देखिल देऊन जाते.

नरकासुराचे प्रतिक असलेल्या कारटांना आदल्या दिवशी संध्याकाळी गोळा करुन तुळशी समोरच्या अंगणात ठेवली जायची. तो एकच दिवस असा होता की आम्हा मुलांना पहाटे लवकर उठविण्यासाठी पालकांना काही त्रास पडायचा नाही. इतर वेळी शाळेत जायचे म्हणून सांगितलेली दाढ, डोकेदुखीची कारणे 'चाव दिवशी' कशी ती गायबच व्हायची...!

मंडळी..! कलासंस्कृतीने आणि श्री. देव रामेश्वराच्या वरदहस्तने पावन झालेल्या आचरा गावात आम्ही जन्मलो हे ही आमचे भाग्य आहे. कोजागिरी ते त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत चालणाऱ्या कार्तिकोत्सवामुळे रात्री पालखी तर भल्या पहाटे काकड आरतीमुळे आमची दिवाळीची पहिली पहाट सदैव रम्यच असते. नरकचतुर्दशी

दिवशी भल्या पहाटे उठून नारळाच्या रसात बनवलेले उटणे अंगाला फासून दातावर दात आपटत कुडकुडणाऱ्या थंडीत केलेली आंघोळ मात्र आता दुर्लभ झाली आहे. बदलत्या वातावरणामुळे 'कुडकुडी भरणारी थंडी' कुठे गायब झाली आहे. अंगावर धुवून स्वच्छ केलेले त्यातल्या त्यात चांगले वाटणारे कपडे घालून, सारवून स्वच्छ केलेल्या अंगणातील तुळशीसमोर भीमपराक्रम केल्याच्या थाटात, आपणच नरकासूराचा वध करत असल्याच्या आविर्भावात कारीट अंगठ्याने नाही जमले तर तळव्याने फोडायचा प्रयत्न करायचो....! पण कारीट जर लहान असले तर ते निसटून बाजूला जायचे आणि पुन्हा प्रयत्न सुरू करायचो. महत्प्रयासाने ते कारीट फुटायचे आणि त्याची बी ओठाला लावत कडू झालेल्या तोंडानेच मोठ्या पराक्रमाच्या आविर्भावात मंदिराकडे निघायचे. वाटेतील मंदिरासमोर कारटे फोडीतच जायचो. फराळाचे दर्शन काही व्हायचे नाही. कारण देवपूजा, फराळाचा देवाला नैवेद्य या सर्व दिव्यांतून तो आमच्यापर्यंत यायचा. आमचा मोठा भाऊ देवपूजा करायचा. काकड आरतीची जबाबदारी वडिलांकडे असल्याने काकड आरतीची आवड आजही आमच्यात भरून राहिली आहे. नरकचतुर्दशीचा काकड आरतीचा प्रसाद देवासमोर ठेवलेल्या फराळाचाच असल्याने त्यात मिळणारे चकली लाडवाचे तुकडे आम्हाला खुपच अप्रूप वाटायचे.

बालपणी दिवाळी म्हणजे फक्त चावदिवसापुरती मर्यादित वाटायची. व्यवसाय सुरू केल्यानंतर आम्ही भाऊबीज, लक्ष्मीपूजन साजरे करू लागलो. भेटवस्तू, मिठाई, फराळाची देवाणघेवाण या बदलत्या सुखवस्तू दुनियेतील सुरू झालेल्या गोष्टी प्रेम आपुलकी निर्माण करत असल्या तरी त्या काळी पोहे, पिठाचे लाडवांची कुणी दिलेली भेट खूपच अप्रूप वाटणारी होती.

दिवाळीच्या सुट्टीतील भरपूर खेळणे सुद्धा विशेष आठवते आहे. क्रिकेट खेळण्यासाठी आम्ही माडांच्या झावळ्याच्या देठापासून म्हणजे पिड्यापासून बनवलेली बॅट वापरायचो. आम्हाला बाजारातील बॅट्पेक्षा सुद्धा त्या बॅटचे 'स्ट्रोक' दमदार होते. सुखवस्तू वाढत चालल्या तशा दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी बाजारात अनेक वस्तू डोकावू लागल्या. त्या खरेदीची ओढ निर्माण होऊ लागली. मात्र चिवारीच्या काठी तासून बनवलेल्या आकाश कंदीलाची गंमत वेगळीच होती.

जीवनशैली बदलत गेली. गरजेच्या वस्तू वाढत गेल्या मात्र लहानपणी गरिबीत साजऱ्या केलेल्या दिवाळीची सर आत्ताच्या झगमगाटातील दिवाळीला आल्यासारखी भासत नाही. मनसोक्त नव्हता बालपणी पण पुढ्यात येणारा फराळ मनाला समाधान देणारा होता. लहानपणी छोट्या - छोट्या गोष्टींच्या सहज स्विकारांमधून आईवडिलांकडून झालेल्या संस्कारांनीच आम्हाला सक्षम बनविले. स्पर्धेच्या युगात आम्हाला सन्मानाने जगायला शिकवले. दिवस बदलले झगमगती दुनिया आली भव्यदिव्यता आली मात्र गरीबीतही साजरी केलेली दिवाळी आणि प्रत्येक सण उत्सव मनाला समाधान देणारे, मन कणखर बनवणारे असेच होते. आमच्या आईवडिलांनी त्या दिवाळीच्या दिवसांमधून आम्हाला जीवनाकडे आनंदासह समाधानाने बघण्याची किती महत्वाची शिकवण न बोलता दिली होती ते आज समजते आहे.



हो.., संवाद साधावाच लागेल...!



लेखन : श्री. दीपक पटेकर
(पत्रकार | सावंतवाडी)

दिवाळी... !
अंधाराकडून उजेडाकडे म्हणजेच तिमिराकडून प्रकाशाकडे नेणारा दिव्यांचा उत्सव.. दीपोत्सव..!

'उठा उठा दिवाळी आली..
लक्ष दिव्यांची आरास झाली..
सडा रांगोळीने सजले अंगण..
फराळ करुनी तृप्त झाले मन..,' दिवाळी येता अशा चारोळ्या स्फुरतात. मन प्रसन्न होत आनंदून जाते. दिवाळीचा हा उत्सव म्हणजे अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा अन् अज्ञानावर ज्ञानाच्या विजयाचे प्रतीक आहे.

दिव्याच्या तेजात आपण हरखून जाता जाता वयाने मोठे होतो आणि सर्वार्थाने विकसीत होऊ लागतो. दरम्यान आपल्या बालपणी साजरा केलेला दिवाळीचा सण जणू विस्मृतीत गेला की काय असा भास होतो.
जमाना बदलला तशा बदलल्या प्रथा, बदलल्या कथा अन् बदलल्या प्रत्येकाच्या व्यथा..!
दारावर तोरणांची रोषणाई, एका रांगेत लावलेल्या चार पाच प्लास्टिक किंवा तत्सम कृत्रिम आकाशदिव्यांनी अंगणात केलेला झगमगाट...रंगबिरंगी पणत्या किंवा मेणबत्त्या लावून पायऱ्यांवर, बाल्कनी मध्ये केलेला दीपोत्सव म्हणजेच दिवाळी..!

नरकचतुर्दशी दिवशी सकाळी उठून उटणे लावून केलेली आंघोळ, तुळशी वृंदावनाच्या समोर कारेटी फोडून कांदे पोहे आणि काही घरात बनवलेला काही विकत आणलेला फराळ आणि वेगवेगळ्या मिठाईची गोडधोड खाण्याची चंगळ, नवनवीन महागडे कपडे घालून महागड्या गाड्यांना किंमती हार घालून मिरवणे, महागड्या वस्तू, पाडवा, भाऊबीजेला भेट देणे. हल्ली नवीन पिढीसाठी

दिवाळी म्हणजे घराची सुंदर रोषणाई, कंदील लावणे, मित्र - मैत्रिणीं सोबत फोटो काढणे आणि सोशल मीडियावर सुंदर पोस्ट शेअर करणे. नव्या पिढीली सण साजरा करताना आपली संस्कृती जपणे आवडते परंतु, त्यांना ती जुन्या चौकटीतील नको असते. नाविन्य, वेगळेपणा जपायला त्यांना आवडते. हवेत उंच उडणारे फटाके लावून होणारे प्रदूषण त्यांना हवा प्रदूषण वाटत नाही पण आपली हौसमौज करताना ही पिढी जल्लोषात दिवाळी साजरी करते. दिवाळीतील आनंद आणि मूळ पावित्र्य हरवू न देता ही पिढी परंपरांना आधुनिकतेची जोड देऊन तोच उत्साह आजही कायम असल्याचे दाखवते आहे.

हे सर्व पाहताना ज्यांनी पूर्वीच्या दिवाळीची अनुभवली आहे त्यांना मात्र प्रश्न पडतो, एवढ्यापुरती मर्यादित राहिली आहे का आज दिवाळी....? माझी दिवाळी....आपली दिवाळी...सर्वांची दिवाळी....!

जुन्या काळातील म्हणा किंवा आपल्या बालपणीची दिवाळी जेव्हा नजरेसमोर येते तेव्हा तो उत्साह, आनंद आणि ती दिवाळी कुठेतरी हरवली की काय..? असा प्रश्न मनाला पडतो. कडाक्याच्या थंडीत पहाटे पहाटे उठणे, कुडकुडतच न्हाणी घरातील चुलीसमोर हात शेकत बसणे, गरम गरम वाफा येणारं पाणी बादलीत ओतून घेताना अंगाला मिळणारी ऊब हवीहवीशी वाटायची. गरम गरम पाणी अंगावर ओतून घेतलं तर थंडीतील गारवा अंगाला झोंबायचा. वाटीतील सुगंधी उटणे अंगाला लावून घेतले की सर्वांग सुगंधित होऊन जायचे. गोरगरिबांच्या आर्थिक परिस्थितीला परवडत नसला तरी घरोघरी मोती साबण असायचा. मोती साबणाने आंघोळ करणे म्हणजे खऱ्या अर्थाने दिवाळीची आंघोळ होणे असेच मानले जात असे. आंघोळ करून ओल्या अंगानेच कुडकुडत, दातावर दात आपटत, थंडीने अंगावर येणारे शहारे हातांवर हात घासून दूर करत अंगणातील तुळशी वृंदावना समोर 'गोविंदा~गोविंदा' ची भक्तीपूर्ण आरोळी देत नरकासुरची प्रतिकृती म्हणून कारेटं फोडणे आणि कारेटीची कडू चव जिभेवर घेणे, एखाद दुसरी बी डोक्यावर विजयतिलक म्हणून लावणे केवढे अभिमानाचे वाटत होते...! मी पहिले की तू पहिले कारेटं फोडणार ही भावंडांमधली वेगळीच स्पर्धा असायची. पहाटे अंगणातील आकाशकंदील,




दारावरच्या पेटवलेल्या मातीच्या पणत्या अंगणात मंद प्रकाश पसरवित असत. त्या प्रकाशात उजळलेले अंगण हा सोनेरी किरणांचा उत्सव भासायचा.

देवासमोर दीप प्रज्वलित करून हात जोडून नतमस्तक होणे, परिस्थितीनुसार शिवलेले नवीन कपडे घालून एकमेकांना उत्साहाने आलिंगन देणे, हस्तांदोलन करत दिवाळीच्या गोड गोड शुभेच्छांची देवाण - घेवाण करणे अशी दिवाळीची संस्कृती आणि परंपरा...! शेतात कापणी केलेल्या नवीन वालयच्या भाताला न्हाणीवर उकडून सकाळी सकाळी पोह्यांची गिरण गाठून रांगेत एक एक पिशवी पुढे सरकवायची. पोहे कांडून मिळताच अलगद डोळे मिटून पोह्यांच्या अवर्णनीय गंधाने पोट भरून घ्यायचे. तो नवीन पोह्यांचा वास मन तृप्त करायचा. दिवाळी दिवशी पोहे खाण्याची आतुरता वाढत असे. हल्ली तसे आपण नेहमीच पोहे नाश्त्याला खातोच तरीही दिवाळीत वालय भाताचे भिजवलेले पोहे किसून मिसळलेला गुळ आणि त्यावर शुभ्र धवल नारळाचे किसलेले खोबरे घातले की याची अविट गोडी वेगळीच लागते. ती गोडी मात्र जुन्या काळातच मिळत होती जी आज कांदे घालून फोडणी दिलेल्या कांदेपोहे पेक्षा कितीतरी पटीने अधिक अनामिक तृप्ती देणारी होती.

बलिप्रतिपदा म्हणजे बळीराजाचे, धनधान्याचे पूजन करण्याचा दिवस. दिवाळी पाडवा म्हणजे पती - पत्नी नात्यातील अत्यंत आनंदाचा दिवस असतो. पत्नी पतीला ओवाळते. पती तिला प्रेमस्वरूप आणलेली भेट देतो. स्वतः किमती कपडे न घेता पत्नीसाठी छानशी साडी तेव्हाही आणली जायची आणि कदाचित तेव्हा बहुतांश मध्यमवर्गीय कुटुंबांमध्ये वर्षभरासाठी तीच एकमेव नवी कोरी साडी पत्नीला मिळायची...!
भाऊबीजेला बहिण माहेरी येणार म्हटलं की, एक वेगळाच आनंद असायचा, तिच्या येण्याने घरात चैतन्य पसरायचे. महागड्या भेटवस्तू नव्हत्या पण भावाच्या चेहऱ्यावरील आनंद आणि बहिणीच्या डोळ्यातील आनंदाश्रूंची आगळीवेगळी देवाणघेवाण व्हायची आणि तीच अमूल्य भेट होती. लक्ष्मीपूजन सुद्धा तेवढ्याच भक्तिभावाने केलं जायचं आणि तुळशी विवाह पर्यंत दिवाळीचा आनंद लुटला जायचा. घरोघरी तुळशीची लग्न लावणे, चुरमुरे, पोहे जे जे काही लग्नात वाटले जाई ते प्लास्टिक पिशवीत भरून आणणे आणि पुढचे काही दिवस चहात



घालून त्याचाच सकाळी नाश्ता करणे ह्यातून अन्नाचे मूल्य समजायचे आणि समजते. ती गरिबी नव्हती. फक्त जे काही मिळायचं त्याचा माज नव्हता. आज तो 'माज' काही मानवी उदाहरणांत दिसला की त्यांच्या पूर्वीच्या पिढीच्या संस्कारांबद्दल खंत वाटते. 'जे अयोग्य आहे ते कितीही पैसा आला तरी अयोग्यच आहे,' असे समजावून सांगायचा संवाद कुठेतरी हरवलाय की काय अशी शंका येते. चोचले पुरविणाऱ्या खाद्यपदार्थांची वानवा होती आणि कदाचित त्यामुळेच बालपणीची दिवाळी आजही डोळ्यांसमोर रेंगाळते तेव्हा अप्रूप वाटतं ती दिवाळी साजरी करताना संस्कार जपून अंधारात चमकणाऱ्या पणत्यांचा स्विकार करून आनंद साजरा करणाऱ्या आपल्याच जुन्या पिढीचे. आजच्या वडिलधारी पिढीने 'लाड आणि चंगळवाद' यांतील फरक समजून घेऊन मुलांना समजावून सांगत संवादातून सक्षमतेचा जागर करणे सुद्धा आनंददायी ठरेल.

काळ बदलला, पद्धती बदलल्या तरी दिवाळीचा मूळ आत्मा, एकमेकांबद्दलचा आदर आणि आपलेपणा टिकवून ठेवणे हीच खरी आजच्या काळाची गरज आहे.



झगमगत्या दुनियेतला अंधार दूर होतोय का....!



लेखन : सौ. आशालता पडवेकर
(ग्रंथपाल । मुंबई)

सध्या शहरात सगळीकडचा हा दिव्यांचा झगमगाट, रोषणाई पाहत असताना मला मात्र दिसत असतो झाडाच्या फांदीवर उंच टांगलेला कंदील...!

माझे मन तब्बल चाळीस वर्ष मागे कोकणात जाते. गावच्या काळोखात लख्ख उठून दिसणारा कंदील डोळ्यांपुढे येतो. त्याकाळी गावात सर्वांच्याच अंगणात उंच टांगलेले कंदील असायचे. दिवाळी जवळ आली की घरातील मुलांची कंदील आणि त्याबरोबरच पतंग बनविण्याची तयारी सुरु व्हायची. मग कंदील किंवा चांदणी बनविण्यासाठी काठ्यांचा शोध सुरु व्हायचा. कंदीलाच्या आकारानुरूप काठ्या तयार झाल्या की मग रंगसंगतीचा विचार करून बाजारातून रंगीत कागद आणले जायचे. पिवळा-हिरवा, नारिंगी, लाल अशा रंगांचे कागद बहुतांशी वापरले जायचे. काठ्यांना ते कागद चिटकविणे हे मोठे कौशल्याचे काम असायचे. घरातील सख्खी - चुलत भावंडे मिळून उत्साहाने ते काम करायचो. कधी कधी मतभेद होऊन हमरीतुमरी होत असे पण मग लगेच दिलजमाई सुद्धा होत असे...! खूप परिश्रम घेऊन तयार केलेला हा कंदील किती उंचीवर बांधायचा यासाठी अंगणातील आंब्याच्या - फणसाच्या झाडाची फांदी शोधली जायची किंवा बांबूच्या आधाराने त्याला उंचावर बांधले जायचे. दुरूनही आपला कंदील सर्वाना दिसला पाहिजे असा खासकरून आम्हा लहान मुलांचा आग्रह असायचा. तयार झालेला कंदील उंचावर बांधला की तो रस्त्यावरून किंवा दुसऱ्या घराच्या अंगणातून दिसतोय की नाही याची खातरजमा केल्यावरच पहिल्या अंघोळीच्या अगोदरच्या रात्रीची शांत झोप लागत असे हे विशेष नमूद करावे लागेल..! पहाटे उठून पहिला अॅटम बॉम्ब कोण लावणार या विचाराने अक्षरशः कितीतरी वेळ झोप लागत नसे.

एरवी कोंबडा कधी आरवतो आणि सूर्याची किरणे घराच्या पायरीला कधी स्पर्श करतात हे आम्हा लहान मुलांना कळत नसे परंतु 'चावदिवस' असला की

आम्ही कसे ते कोंबड्याच्या पहिल्या बांगेलाच उठायचो...!
फराळ खाण्यापेक्षा पहिला ॲटम बॉम्ब लावण्यातच अपार आनंद मिळायचा. पहाटेच्या नीरव शांततेत बॉम्बचा आवाज घुमत घुमत दूरवर पोहोचायचा. लागोपाठ तीन किंवा पाच बॉम्ब लावल्यानंतर आई आम्हाला लहान मुलांच्या अंगाला उटणं लावत असे. काटा उभा राहिलेल्या अंगानेच न्हाणीवर तापलेल्या कडकडीत पाण्याने अंघोळी व्हायच्या. त्यातही पहिल्यांदा कुणी अंघोळ करायची यावरून छोटी मोठी भांडणे होत असत. दातांवर दात आपटत असतानाच ओल्या अंगाने तुळशीपुढे ठेवलेली चार-पाच तरी कारेटी फोडायची. ज्याला जेवढी लागतील तितकी कारेटी फोडायची तजवीज आदल्या दिवशीच केली गेलेली असायची. चांगली टोपलीभर कारेटी तुळशी वृंदावना समोरच्या सारवणावर ठेवलेली असत. 'गोविंदा रे गोपाळा' असं म्हणताना जणू काही नरकासुराला आपणच पायाखाली ठेचल्यासारखे वाटायचे. नंतर मग आजूबाजूच्या घरांच्या अंगणातून अशाच आवाजांची एकामागोमाग आवर्तने ऐकू यायची.

इकडे मुलांची ही गडबड सुरु असताना घरातल्या बायकांची वेगळीच धांदल असे. सर्वांच्या अगोदर उठून, स्वतःच उटणे लावून, आंघोळ करून विहिरीचे पाणी आणणे आणि नंतर गुळ आणि काळे तीळ घालून केलेल्या नारळाच्या दुधाच्या गोड रसात पोहे भिजवणे असे त्यांचे पहिले महत्वाचे काम असायचे. त्या गोड पोह्यांचा नैवेद्य सर्वप्रथम विहिरीवर, तुळशीपुढे ठेवायच्या. दिवा लावायचा आणि त्यानंतर मग इतर कामांना सुरुवात करत असत. घरातील सर्वांच्या आंघोळी म्हणजे अभ्यंगस्नान झाले की सर्वचजण एकत्र फराळ खायला बसत असत. चण्याच्या पिठाचे, शेंगदाण्याचे, काळ्या तिळाचे, एखाद्या वर्षी रव्याचे, पिठाचे लाडू, फरसाण, बिस्कीट आणि गोड पोहे असा आमचा बहुतांश दिवाळी फराळ असायचा. सर्वजण अगदी आवडीने खात. नंतर सगळेजण चहा पिऊन तांबडे फुटता फुटता भातकापणीला किंवा भुईमूग काढायला शेतात जात असत.

त्याकाळी दिवाळी पाडवा, लक्ष्मीपूजन या दिवसांचा आमच्या गावी सामान्य कुटुंबांमध्ये तितकासा गाजावाजा नसे. जे दुकानदार होते त्यांच्याकडे लक्ष्मीपूजन होत असे. बाकी शेतकरी वर्ग त्यांच्या धान्य लक्ष्मीच्या स्वागतामध्ये व्यस्त

असे. भाऊबीजेला घरात जी वस्तू नाहीय तीच वस्तू ओवाळणीसाठी आणली जायची. ताट, वाटी, डिश, तांब्या भांडे, कळशी अगदी शाळेचे दप्तर सुद्धा भाऊ आपल्या बहिणीला भाऊबीज म्हणून देत असे.

आजकाल भावांना प्रश्न पडतो की, 'बहिणीला ओवाळणी काय द्यायची कारण तिच्याकडे तर सगळ्या वस्तू आहेत...!'
आता हे केवळ भाऊबीजेच्या ओवाळणीच्या बाबतीतच नाही तर सर्वच गोष्टीत घडत आहे. माणसांकडे सर्व काही आहे पण एकमेकांकडे जायला वेळ नाही. फोनवर सुद्धा बोलायला वेळ नाही. आपण वास्तवापेक्षा आभासी जगातच सर्वजण रमू लागले आहोत. चकचकीत दिसणारे स्टेटस आणि स्टोरी यावरून माणसांचा दर्जा ठरू लागलाय.

बालपणीच्या सर्वसमावेशक समानतेचा तो भरगच्चपणाचा काळ पुन्हा यावा असे आज रोज वाटत रहाते. सर्वांच्या अंगणातला पणत्यांचा उजेड हा अंगणासह मनाच्या काळोखाला भेदणारा होता.

आज खिडकीच्या जाळ्या आणि गजांना विविध कंदील लावले जातात, डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते.... परंतु मनोमन असे प्रश्नार्थक उद्गार चालू असतात की एवढ्या चकचकीत दिव्यांचा झगमगाट 'दिसताना' मनातील द्वेषाचा, गैरसमजाचा, असमानतेचा, भेदाचा आणि असहिष्णुतेचा अंधःकार खरोखरच दूर 'होतोय' का...! 'झगमगत्या दुनियेतला अंधार दूर होतोय का,' हे आपापल्या परीने तपासून बघणे हीच मानवी सुसंस्कृतपणाची अत्यावश्यकता ओळखण्याची निखळ व उजळ दिवाळी पुन्हा अनुभवुया... आपण सर्वांनी...!



शाही दिवाळी, माझी आई दिवाळी....!



लेखन : सौ. निशिगंधा सुलोचना नारायण वझे - चिंदरकर
(शिक्षिका, सिंधुदुर्ग)

दिवाळी सण म्हणजे कुठल्याही वयात बालपण आठवायची एक संधी...! आपली माती, नाती - गोती, संस्कृती आणि सर्व सात्विक घटकांचा प्रकाशाने जागर करणारी दिवाळसणाची पणती...!

माझं बालपण श्रमिक मध्यमवर्गीय कुटुंबातले आहे. मेहनतीला प्राधान्य, समजुतदारपणा हा एक दागिना आणि सर्वांच्या श्रमांचा भेदभाव विरहित उचित सन्मान अशा शिकवणीतून आम्ही चार भावंडे यथाशक्ती सालसपणा जपत - जपत वाढलो. मी चार भावंडांपैकी शेंडेफळ असल्याने माझ्या छोट्या - मोठ्या चुकांसाठी 'दुरुस्तीची' एक संधी लाडाने मिळत होती. वय वाढत गेल्यानंतर आपण दुरुस्तीची संधी न घेता कसे जगावे याची जाण येऊ लागली. दिवाळीचा सण हा माझ्या जीवन शिक्षणाच्या शाळेतलाच एक वार्षिक टप्पा होता. माझे जीवन हे माझ्या आई - वडिलांच्या संस्कारांची एक बिनभिंतीची शाळा होती.... किंवा आजही मनोमन मी त्यातच असते.

माझ्या आईच्या अत्यंत नियोजनपूर्वक आखणीमुळे आम्हा भावंडांना बालपणापासून दिवाळ सणापूर्वीचा पंधरवडा, प्रत्यक्ष दिवाळी आणि दिवाळीनंतरचा पंधरवडा अशी साधारण एकंदर ४० दिवसांची दिवाळी साजरी होताना बघायचे संस्कार भाग्य लाभले. वडिलांचा हार्मोनिअम निर्मितीचा व्यवसाय होता. तो व्यवसाय संस्कृती, सण आणि सर्जनशीलतेचा वर्षभराचा प्रापंचिक यज्ञ होता. त्या यज्ञात माझ्या आईच्या धोरणी धिरोदत्तपणाच्या सक्रीय जाणीवांच्या समिधा अत्यंत शाही पद्धतीने समर्पित होत असत. माझी आई दिवाळीपूर्वीच्या आखणीमध्ये, माझा दादा आणि आम्ही तीन बहिणी यांना 'काय, कसे, किती आणि का' अशी 'क' ची सण उत्सव आधारित सशक्त बाराखडीची कृतीने उजळणी करून घेत असे. आईने सहिष्णुतेसह

सर्वसमावेशक दिवाळीसह जीवनाची बिजे आमच्यात घट्ट रोवलेली आहेत त्यामुळेच कदाचित आज एक शिक्षक म्हणून आवश्यक असलेली प्रगल्भता गुगलवरून शिकत आयात करावी लागत नसावी...!

आईचे फराळ निर्मितीचे आणि त्याच्या यथाशक्ती वाटपाचे नियोजनसुद्धा व्यवस्थापन कौशल्याची शिकवणी होती. आई नेहमीच प्रत्यक्ष चावदिवस, लक्ष्मीपूजन, भाऊबीज, पाडवा ते पार तुलसी विवाहापर्यंत पुरेल इतका फराळ करायची आणि तुलसी विवाहानंतर सुद्धा तिच्या नियोजनात बचत केला गेलेला फराळाचा एखादा डबा पुढच्या आठवडाभरासाठी सज्ज ठेवलेला असायचा. तो डबा ती कुठे, कसा आणि कधी राखून ठेवायची ते आईच जाणे...! आम्ही विचारले तर ती फक्त मंद हसायची.....आणि आईचे सौंदर्य ममत्वाच्या प्रकाशाने आणखीन उजळून यायचे...! माझी आईच साक्षात तेजोमय 'दिवाळी' होती हेही आज कळत जातंय..!

आज ते दिवस आठवले की माझी आईने न बोलता गिरवायला लावलेले जीवन शिक्षणाचे धडे आणि तिने दिवाळसणाच्या माध्यमातून शिकवलेला 'शहाणपणा हाच शाहीपणा' हा विचार रोज नव्याने प्रगल्भ करत जातो. माझ्या आईच्या शाही दिवाळीने आम्हाला, 'शाहीपणा हा साधनांच्या उपलब्धतेवर नसतो तर तो दैनंदिन जीवनातून बचत करत राखलेल्या घटकांची सात्विक सुसंस्कृत उधळण असते' हा जीवन संदेश दिलेला आहे.

आपली सिंधुनगरी न्यूज चॅनेलच्या 'आकाशकंदील दीपावली विशेषांक २०२६' च्या निमित्ताने तोच शाहीपणाचा संदेश आपणा सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा म्हणून सस्नेह समर्पित करते...!



प्रत्येक दिवाळी नूतन आनंदपर्व आहे....!



लेखन : राजश्री वायंगणकर
(ज्येष्ठ व्यावसायिक, मालवण)

दिवाळी..! प्रत्येकासाठी अनुभवण्याचे, जगण्याचे एक स्वतंत्र आकाश.. आणि सर्वांनाच लख्ख करण्यासाठी सदैव तेवत राहणारा आनंदाचा दीप..अर्थात आजचा कंदील...! प्रत्येकाच्या दिवाळीच्या आठवणी वेगळ्या, प्रत्येकाच्या आनंदाच्या कल्पना वेगळ्या आणि प्रत्येकाच्या मनात साठवलेला या सणाचा ठेवा तर अगदी खास!

जन्माने खोत घराणे आणि 'गो' कुळातील बालपण लाभल्यामुळे आमच्या दिवाळीच्या आठवणींना एक वेगळाच सुगंध आहे. आजच्यासारखी सहज उपलब्ध असणारी साधने नव्हती पण मनाला आनंद देणाऱ्या, निसर्गाशी आणि आपल्या मातीशी नाते जोडणाऱ्या अनेक गोष्टी होत्या. घरात आई - वडिलांसह आम्ही सात भावंडे आणि गाई, वासरे, म्हैशींचा गोठा हेच आमच्यासाठी नंदनवन..! गोठा म्हणजे केवळ जनावरे बांधण्याची जागा नव्हती, तर तो आमच्या रोजच्या जगण्याचा, आनंदाचा भाग होता.

गाई - म्हैशींचे दूध काढून ते विकण्याचा पिढीजात व्यवसाय होता. वडील काजूची माडी, शेणाच्या गोवऱ्या विकत. त्यातून मिळणारे उत्पन्न आणि गाई - म्हशींच्या दुधाच्या व्यवसायातून मिळणारा आधार यावर कुटुंबाचा संसार सुरू होता. घरात कष्ट होते, जबाबदाऱ्या होत्या; पण त्याचबरोबर समाधान आणि आनंदही होता.

दिवाळी जवळ आली की घरात लगबग सुरू व्हायची. दिवाळीचा कंदीलही घरच्या कल्पकतेतूनच साकारायचा. चिव्याच्या बांबूच्या काड्यांचा वापर करून कंदिलाची चौकट तयार केली जायची. त्याला योग्य आकार देत, त्यातच पणती

ठेवण्यासाठी छोटीशी बैठक केली जायची. त्या बैठकीत तेलाची पणती ठेवली की तिच्या मंद प्रकाशाने तयार झालेला कंदील उजळून निघायचा. नंतर कपीच्या सहाय्याने कंदीलाला दोरी बांधून तो हळूहळू वर नेला जात असे. स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या त्या कंदिलाचे अप्रूप काही वेगळेच होते.



घराची स्वच्छता, अंगणाची आवराआवर, गोठ्याची साफसफाई आणि दिवाळीच्या फराळाची तयारी अशा कामांनी घर गजबजून जायचे. आईची फराळ बनवण्याची धांदल सुरू असायची. घरच्या घरी केलेल्या फराळाचा सुगंध घरभर दरवळायचा. चकली, लाडू, पोह्यांचा चिवडा, करंज्या अशा पदार्थांची तयारी करताना घरातील सगळ्यांचाच हातभार लागायचा.

आमच्या जीवनात गुराढोरांचे स्थान महत्त्वाचे होते. त्यामुळे दिवाळीच्या आनंदातही त्यांच्या सहवासाचा एक अविभाज्य भाग असायचा. सकाळी उठल्यापासून गाईंची हाकाटी, वासरांची बागडणारी पावले, म्हशींची लगबग आणि गोठ्यातील रोजची कामे हे आमचे जीवन होते. त्या वातावरणात वाढताना कष्टांची जाणीव झाली, जबाबदारी समजली आणि येणारी स्थिती स्विकारण्याचे संस्कार आपसूकच मिळाले.

खरं तर दिवाळी ही वयाबरोबर बदलणारी, पण मनातील आनंद कायम ठेवणारी अनुभूती आहे. बालपणीच्या आठवणींचा सुगंध आणि आजच्या काळातील नव्या आनंदाची अनुभूती या दोन्ही माझ्यासाठी तितक्याच मोलाच्या आहेत. प्रत्येक काळाची दिवाळी आपले वेगळेपण घेऊन येते आणि आपणही त्या प्रत्येक नव्या रंगाचे तितक्याच आनंदाने स्वागत करायचे असते, असे मला वाटते.

'सॉफ्टलॅब्ज गृप' शुभेच्छांकित...

आपली सिंधुनगरी न्यूज चॅनेल प्रस्तुत

दिवाळी विशेष अंक २०२६

आकाशकंदील

आपला सिंधुनगरी न्यूज चॅनेल

माध्यम जे जपते बातमी सोबत संस्कृती

संस्कार दिवाळी..

स्विकार दिवाळी...!

शुभ दीपावली

मुख्य संपादक : सुयोग पंडित